GRT

Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# उंच प्रदेशातील युद्धतंत्र - कारगील युद्ध- एक अभ्यास

प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.

विभागप्रमुख , संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे .

## प्रस्तावना

आजवरचे सर्वाधिक उंचीवर लढले गेलेले युद्ध म्हणजे कारगील युद्ध होय. कारगील युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान इ.स.१९९९ च्या उन्हाळ्यात लडले गेलेले युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगील व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादीत राहीली. त्यामुळे याला मर्यादीत युध्द म्हणतात. युद्ध सुरु झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. मे च्या दुसऱ्या आठवड्यात स्थानिक मेंढवाळ यांनी घुसखोरीची सूचना भारतीय सैन्यास दिली.

इ.स. १९९९ च्या उन्हाळ्यात पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सिमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाण्यांवर कब्जा केल्याचे भारताच्या लक्षात आले व या घुसखोरांना हुलकावण्यासाठी कारगील हे युद्ध झाले. अण्वस्त्र सज्जतेनंतरचे पहिले युद्ध तरीही भारताने मर्यादित ठेवले.

समुद्रसपाटीपासून १४,००० ते १८,००० फुटांवर वसलेला कारगिल हा भाग भारत-पाकिस्तान असलेल्या जम्मू



काश्मीर क्षेत्रातील सीमेजवळील भाग आहे. दोन्ही देशांकडून या भागात सैन्य तैनात केलेले असते. मात्र हिवाळ्यात या भागात बर्फाचा सुमारे ४० फुटांचा थर साचतो. त्यामुळे दोन्ही देशांचे सैन्य या भागातून मागे घेतले जाते. एप्रिल-मे महिन्यात बर्फ वितळण्यास सुरुवात झाल्यावर परत सैन्य तो भाग आपल्या ताब्यात घेते.

१९९९ मध्ये बर्फ वितळण्यास झाल्यावर जेव्हा भारतीय सैन्य कारगिलचा भाग आपल्या ताब्यात घेऊ लागले. तेव्हा त्या भागात सीमेपलीकडून अनेक घुसखोर आल्याचे आढळून आले. ९ मे १९९९ ला भारतीय सैन्यदलाच्या १५ व्या कॉर्पसला कारगिल भागात घुसखोरी झाल्याचे सर्वप्रथम आढळून आले. घुसखोरांनी भारतीय सीमारेषेतील ५ ते ७ कि.मी. अंतर आतापर्यंत असा सुमार २०० कि.मी. चा पट्टा ताब्यात घेतला होता.

यानंतर तो भाग भारताकडून पुन्हा ताब्यात घेण्याची कारवाई सुरु झाली. कारगिलमध्ये पाकिस्तानकडून झालेल्या घुसखोरीविषयी महत्त्वपूर्ण बाबी.

- कारगिलमध्ये पाकिस्तानकडून झालेल्या घुसखोरीला जानेवारी १९९९ मध्येच सुरुवात झाली होती.
- भारतीय सीमा भागात प्रवेश करणारे पाकिस्तानी सैनिक नसून काश्मीरच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे मुजाहिदीन आहेत हा पाकिस्तानचा दावा खोटा होता. कारगिल भागात झालेल्या घुसखोरित अधिकृत पाकिस्तानी सैन्याचा हात होता.
- भारतीय सीमा भागात यापूर्वी झालेल्या घुसखोरीपेक्षा ही घुसखोरी वेगळी होती. यापूर्वी झालेल्या घुसखोरीचे स्वरुप हल्ला करणे आणि पळून जाणे असे होते. मात्र १९९९ मध्ये झालेल्या घुसखोरीचा मुख्य उद्देश कारगिलचा भाग ताब्यात घेणे हा होता. त्या ठिकाणी घुसखोरांनी बांधलेल्या सिमेंटच्या बंकर्सवरुन हे स्पष्ट होते. हा भाग नेहमीसाठी ताब्यात घेऊन तेथे आपले नियमित सैन्य तैनात करण्याची पाकिस्तानची योजना होती. या भागातून पुढील काळात भारताविरुद्धच्या आतंकवादी कारवायांचे संचालन करणे हा कारगिल घुसखोरीमागील मुख्य उद्देशांपैकी एक उद्देश होता.

### कारगील युद्धामागे पाकिस्तानची उद्दिष्टे :

1. भारत-पाकिस्तानदरम्यानच्या अटलबिहारी वाजपेयी

२. आणि नवाझ शरीफ यांनी सुरु केलेल्या शांतता प्रक्रियेला अडथळा निर्माण करणे.
३. काश्मीरमधील मुजाहिद्दीन यांचा लढा हा काश्मीरच्या मुक्तीसाठी असून त्यासाठीच त्यांनी भारताच्या प्रदेशात घुसखोरी केली. असे चित्र उभे करुन काश्मीरच्या लढ्याला आंतरराष्ट्रीय स्वरुप देणे.
४. भारताचे या क्षेत्रावर झालेल्या दुर्लक्षाचा फायदा घेऊन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या दक्षिणेकडील शक्यतेवढ्या भूभागावर ताबा मिळविणे.
५. १९८४ पासून भारताने सायचिन हिमनदी या भागात भक्कम तळ निर्माण केला आहे. त्याच्याशी भारताचा असलेला संपर्क तोडून त्याला अलग पाडणे.
६. काश्मीर खोऱ्यातील दहशतवाद्यांचे मनोधैर्य वाढविणे व संपूर्ण काश्मीरमध्ये दहशतवादाला चालना देणे.
७. भारतीय सैन्याला नियंत्रण रेषेवर गुंतवून उर्वरीत काश्मीरमध्ये पाकिस्तानला समर्थन देणाऱ्या दहशतवाद्यांना मोकळे रान मिळवून देणे.
८. श्रीनगर लेह मार्गावर नियंत्रण मिळविणे व पाकिस्तानचा सामरीक सहकारी चीनला या क्षेत्रात भावी काळात कार्यवाही करणे सोपे जाईल अशी व्यवस्था करणे.
९. १९८४ मध्ये भारताने सीयाचीन क्षेत्रात 'ऑपरेशन मेघदूत' ही मोहिम राबवून पाकिस्तानचा जोरदार पराभव करुन पाकची नाचक्की केली तीचा सूड घेणे.
१०. भारतविरोधी कारवाई करुन पाकिस्तानी लोकांमध्ये लोकप्रियता मिळविणे.

## ऑपरेशन विजय (Operation Vijay)

कारगिल भागात पाकिस्तानकडून झालेली घुसखोरी हाणून पाडण्यासाठी भारताकडून करण्यात आलेली सैनिकी मोहीम 'ऑपरेशन विजय'(Operation Vijay) म्हणून ओळखली जाते. कारगिलचा भाग अत्यंत दुर्गम असल्याकारणाने घुसखोरांना हाकलून लावण्यासाठी भारतीय हवाई मदत घेण्यात आली.

या युद्धात भारतीय हवाई दलाने भारतीय सैन्यादलाबरोबर उत्तम समन्वय साधून घुसखोरांना आपल्या सीमेतून हाकलून लावले.

ती ठाणी महत्त्वाची आणि उंचावर आहेत. त्यामुळे त्या ठिकाणावरुन ५-६ सैनिकही एखाद्या कंपनीला भारी पडू शकतात. कारगिल महत्त्वाची ठरणारी ही शिखरे केवळ १५ दिवसात पुन्हा हस्तगत करण्याची महत्त्वाची कामगिरि राजपुताना रायफल्सने बजावली.

कारगिल क्षेत्रातील भारतीय प्रदेशात पाकिस्तानी घुसखोरांनी प्रवेश करुन तो प्रदेश ताब्यात घेतला होता. भारतीय प्रदेशातील पाकिस्तानी घुसखोरी दिवसेंदिवस वाढतच होती. त्या घुसखोरांविरुद्ध भारतातर्फे "ऑपरेशन विजय" सरु करण्यात आले. 'ऑपरेशन विजय' मध्ये भारतीय सैन्याने प्राण संकटात घालून एकामागून एक यशस्वी चढाया केल्या. त्यांनी "टायगर हिल्स", "जुबार हिल्स", "तोलोलिंग", यांसारखे आपले प्रदेश हळूहळू ताब्यात घेतले. १८-१९ हजार फुटावर शत्रू असताना प्राणाची बाजी मारुन आपल्या जवानांनी ठाणी सर केली. त्या जवानांच्या शौर्याला तोड नाही. त्यामध्ये जे धारातीर्थी पडले, त्यांची स्मृती नजरेआड करता येत नाही.

'ऑपरेशन विजय' मध्ये हवाई दलाने सुद्धा उत्तम कामगिरी केली. त्यामध्ये हल्ले करण्यासाठी सुमारे ५५० आणि टेहाळणी करण्यासाठी १५० उड्डाणे झाली. तसेच जवानांना सुरक्षितपणे आणण्यासाठी सुमारे ५०० उड्डाणे झाली. हेलीकॉप्टर्सची तर २१८५ उड्डाणे झाली. त्या सर्वांचा कालावधी एकूण ९२५ तासांचा होता.

पॉइन्ट ५२८५, पॉइन्ट ५२९९, द्रास बटालीक इत्यादी क्षेत्रात जवानांनी आणि अधिकाऱ्यांनी प्रचंड प्रमाणात उत्साह दाखवून शौर्याची शर्थ केली. बटालीक भागातील युद्ध जिंकण्यासाठी "बोफोर्स" कंपनीच्या FH-77B हॉवित्झर्ट तोफा उपयोगात आणण्यात आल्या. तोफांची मारकशक्ती उत्तम ठरली. बोफोर्सची गुणवत्ताही सिद्ध झाली. बोफोर्स तोफांचे तोफगोळे मात्र बाहेरुन आयात करावे लागले. बोफोर्स तोफांच्या माऱ्याचा आश्रय घेऊन जवानांची आगेकूच सुरुच होती.

उंच प्रदेशातील युद्ध धारणेत उपयोगात येणाऱ्या विमानभेदी तोफा भारतातर्फे उपयोगात आणल्या गेल्याने लष्कराचा उत्साह द्विगुणीत झाला. शत्रूच्या मार्गालगत बोफोर्स तोफा तैनात करण्यात आल्यात.

घुसखोरांना रसद पुरवठा मश्को खोऱ्यातील ज्या मार्गावरुन होतो त्या लक्ष्यावर भारतीय हवाईदलाच्या जेट विमानांनी बॉंब हल्ले केले. त्यात शत्रूची मोठी जीवित हानी झाली. कॉक्सर व बटालीक क्षेत्रातही भारतीय हवाईदलाने बॉंब हल्ल्यांचा मारा केला.

अति उंच प्रदेशात लढाई करण्याची ही जागतिक इतिहासातील पहिलीच वेळ होती.अतिशय थंड आणि प्रतिकूल हवामानातही २२-२५ वर्षांच्या कोवळ्या जवानांनी देशभक्ती मनाशी बाळगून युद्धात उडी घेतली. भारतीय जवानांचे शौर्य, धैर्य आणि त्यांची त्यागाची

भावना या युद्धातूनच जगाला प्रशंसनीय ठरली. अति उंच प्रदेशातील हवाई हल्ले करण्याची हवाईदलाची सुद्धा ही पहिलीच वेळ होती. एवढ्या उंच प्रदेशावर कोणत्याही हवाईदलाने सतत हल्ला केलेला नव्हता.

कारगिल युद्धामध्ये यश मिळविण्यासाठी पाकिस्तानी सैनिकांनी १९९८ मध्ये टेकड्या चढण्यास सुरुवात केलेली होती. भारतीय पोषाखामध्ये या प्रदेशात शिरुन अनेक मजबूत बंकर्स तयार केले. त्यांचे ते बंकर्स स्टील गर्डर्स आणि सिमेंट कॉन्क्रीटचे बतविलेले होते. त्यामुळे भारतीय लष्काराला ते उध्वस्त करण्यासाठी खूप कष्ट करावे लागले आणि वेळही खर्च करावा लागला.

### शरद गोपाळ बेडेकर - कारगिल - हिमालयातील धगधता निखारा

'ऑपरेशन विजय' मध्ये भारतीय लष्कराला व्यवस्थितरीत्या रसद पुरवठा झाला. भारताकडे तोफा होत्या पण तोफगोळे नव्हते. तरीसुद्धा तोफगोळे आयात करुन पुरवठा सुरळीत ठेवण्यात आला. स्थलसेना आणि हवाईसेना यांच्या समन्वयाने पुरवठा व्यवस्था सुरळीत राहिली. जवानांचे मनोधैर्यसुद्धा शेवटपर्यंत उंचावलेले होते. पुरवठा व्यवस्थेमध्ये सैनिकांची परस्परांना मदत तर होतीच शिवाय सर्व भारतीय नागरिकांची त्यांना साथ होती. त्यांची मदत त्यांच्या पाठीशी होती व त्यामुळे अतिशय कठीण, बर्फाच्छादीत, उंच प्रदेशात योग्य त्या साधनसामग्रीशीवाय भारतीय लष्कराने दाखविलेले धैर्य व शौर्य उल्लेखनीय ठरले.

तोलोलींग आणि त्या परिसरातील महत्वाची शिखरे ताब्यात घेण्याची महत्वाची कामगिरी राजपुतांना रायफल्सने केली. पाकिस्तानी घुसखोरांनी इतकी मोक्याची ठाणी ताब्यात घेतली होती की, त्यांना हिवाळा सुरु होण्यापर्वी हटविणे भारतीय लष्कराला पहिल्या फेरीत अगदी अशक्य वाटत होते.

### इंटेलिजन्सचे कार्य :

अतिउंच प्रदेशातील युद्धधारणा विशिष्ट प्रकारची असते. त्यामध्ये पुढील प्रकारचे कार्य सामावलेले आहे.

१) शत्रूविषयीची संपूर्ण सविस्तर माहिती उपलब्ध करणे.
२) वायुदल आणि त्यामधील आवश्यक साधने यांची उपलब्धता.
३) नागरीसुविधा आणि लष्करी कार्य यांचा परस्पर संबंध.
४) सैनिकांचे आणि लष्करी अधिकाऱ्यांचे मनोधैर्य व तयारी.
५) प्रचार युद्धाची सज्जता.
६) स्थानिक नागरिकांची मदत.
७) लढाई क्षेत्राची संपूर्ण भौगोलिक माहिती.
८) सैन्य शस्त्रास्त्रे आणि युद्ध साहित्याची उपलब्धता.

भारतीय इंटेलिजन्स ब्युरोला शत्रूच्या घुसखोरिविषयी माहिती होती. तसेच 'रॉ' च्या कार्यालयाला कारगिल घुसखोरीविषयी आधीच माहिती मिळालेली होती.

### पायदळाचे कार्य

कारगिलच्या युद्धामध्ये भारतीय सेनेच्या पायदळ, तोफखाना, अभियंता - दल, वैद्यकियदल, वायूसेना या सर्वांनीच मोलाचे कार्य केले. पायदळाच्या माऊंट डिव्हाजन ग्रेनेडिअर तोफखाना राजपूतांना रायफल्स यांनी तोलोलिंग आणि अन्य टेकड्यांवर चढाईची यशस्वी कार्यवाही केली.

### तोफखाना कार्य

तोफखान्याच्या सततच्या आणि अचूक माऱ्यामुळे उंच टेकड्या हस्तगत करणे शक्य झाले, तोफखान्यामध्ये बोफोर्स तोफांनी उल्लेखनीय कामगिरी केली. तोफखान्याद्वारे शत्रूवर सतत गोळा फेक सुरु होती. अत्याधुनिक बोफोर्स तोफांनी सुद्धा आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले. बोफोर्स तोफांच्या नेत्रदीपक कार्याबरोबर मिडीयम गन, मॉर्टर्स आणि फिल्डगन यांनी मर्दमूकी गाजविली, एकाचवेळी ४० रॉकेट मारणाऱ्या मल्टी बॅरल रॉकेट लॉथरने सुद्धा कामगिरी बजावली.

## इंजिनिअर्स आणि सिग्नल्स कार्य

डोंगराळ प्रदेशामध्ये अभियंतादलाने उत्कृष्ठ कार्य केले. शत्रूच्या ठाण्याजवळील सुरुंगांना निकामी करणे, पायदळासाठी पायवाटा करणे, ठाणे ताब्यात घेतल्यानंतर सैनिकांसाठी बंकर्स, सेल्टर बांधणे, खेचरांसाठी रस्ते तयार करणे, पिण्याच्या पाण्याचा साठा उपलब्ध करणे इत्यादी कार्य चोख केले. सिग्नलने योग्य संदेश यंत्रणा उभारली आणि ती कार्यशील ठेवली. सर्व संदेश रेडिओ सेटवरुन सुद्धा नियंत्रित केले. अतिशय कठीण आणि जिकरीचे काम केले.

## वायू सेना कार्य

कारगिलच्या युद्धामध्ये वायू सेनेचे कार्य अतिशय महत्वाचे आणि अचूक होते, वायू सेनेचे हे कार्य 'सफेद नगर' या नावाने पूर्ण झ़ाले. वायू सेनेच्या या मोहिमेमध्ये सुमारे ५५० विमान आघात उड्डाणे झालीत. रॉकेट, मिग जातीची लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स या सर्वांनी व्यवस्थितपणे बॉम्ब वर्षाव केला. वायू सेनेचे हे कार्य म्हणजे मर्यादित युद्धात नियंत्रित स्वरुपात वायू सेनेचा उपयोग करण्याचा एक आश्चर्यकारक आगळा वेगळा प्रयोग होता.

## पुरवठा व्यवस्था

कारगिलच्या युद्धात पुरवठा व्यवस्थेचे कार्य चोखपणे आणि अखंडपणे सुरु होते. अन्न, वस्त्र, निवाऱ्या व्यतिरिक्त पाणी, बांधकाम साहित्य आणि तोफेच्या गोळ्यांचा सतत पुरवठा केला जात होता. शिबीर, वैद्यकिय मदत आणि उच्च मनोधैर्य सांभळण्याचे कार्यही सुरु होते. सर्वांचा हातभार लागूनच पुरवठा व्यस्थेचे कार्य सुरळीतपणे सुरु होते.

## कारगिल युद्धाचा घटनाक्रम

९ मे १९९९ - प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भारताकडील पाकिस्तानी घुसखोर आढळून आले.

१४ मे १९९९ - घुसखोरांकडून भारताची दोन गस्ती हेलीकॉप्टर्स पाडण्यात आली.

२६ मे १९९९ - पाक घुसखोरांना हाकलण्यासाठी ऑपरेशन विजयाची योजना, प्रत्यक्ष युद्धास सुरुवात, कारगिल भागातील द्रास, बटालीक क्षेत्रातील शिखर टापूवर भारतीय हवाई दलाचे हल्ले सुरु.

३१ मे १९९९ - पाकिस्तानी पंतप्रधान नवाज शरीफ यांचा परराष्ट्र मंत्री सरताज अजीज यांना चर्चेसाठी दिल्लीला पाठविण्याचा प्रस्ताव भारताकडून स्वीकृत.

३ जून १९९९ - फ्लाईंग लेफ्टनंट नचिकेत यांची सुटका.

७ जून १९९९-पाकिस्तानकडून घुसखोर मागे घेतल्याशिवाय पाकशी चर्चा नकरण्याचा भारताचा निर्णय.

११ जून १९९९- घुसखोरांमध्ये अधिकृत पाकिस्तानी सैन्य असल्याचे स्पष्ट झाले.

१२ जून १९९९ - पाकिस्तानी परराष्ट्रमंत्री सरताज अजीज यांच्याशी झालेली बोलणी अयशस्वी. हवाई दलाचे हल्ले थांबविण्याची पाकिस्तानची मागणी भारताने फेटाळली.

१६ जून १९९९ - घुसखोरावर नियंत्रण नसल्याचा पाकिस्तानचा दावा.

१७ जून १९९९ - तोलेलींग, बटालीक, टायगर हिल व जुगर हील भारताच्या ताब्यात पाकचा संभाव्य सागरी हल्ला परतावण्यास भारतीय नौदल सज्ज.

२१ जून १९९९ - टायगर हिल, द्रास भागात घनघोर युद्ध. काश्मीर प्रश्नी जर्मनीचा भारताला पाठींबा.

४ जुलै १९९९ - पाकिस्तानी घुसखोर मागे घेण्याची अमेरिकी राष्ट्रध्यक्ष क्लिंटन यांची पाकिस्तानी पंतप्रधान नवाज शरीफ यांना सूचना.सिमला व लाहोर करारानुसार चर्चा करण्याची पाकची तयारी.

८ जुलै १९९९ - अमेरिकेचा पाकिस्तानला सैन्य मागे घेण्याचा स्पष्ट इशारा.

१० जुलै १९९९ - पंजाब सीमेवर पाककडून घोरी क्षेपणास्त्र तैनात.

११ जुलै १९९९ - वाघा सीमेजवळील अतारी येथे भारत आणि पाकिस्तानच्या डायरेक्टर्स जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स (DGMO) ची बैठक. युद्ध थांबविण्याचा व घुसखोर परत बोलविण्याचा पाकिस्तानचा निर्णय.

१२ जुलै १९९९ - पाकिस्तानकडून घुसखोरी मागे घेण्यास १६ जुलै ही मुदत ठरविण्यात आली. या मुदतीनंतर कोणताही घुसखोर भारतीय प्रदेशात आढळल्यास त्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचा भारताचा निर्देश.

१७ जुलै १९९९ - द्रास, बटालीक, कुक्सार मइकोड या कारगिल भागातून पाकिस्तानी घुसखोरांची माघार.

## ऑपरेशन विजयचे फलीत (output of Operation Vijay)

१) कारगिलच्या घुसखोरीमुळे भारताच्या सैनिकी आणि राजकीय नेतृत्वास जबरदस्त धक्का पोहचला. कारगिलमधील पाकिस्तानी घुसखोरी ही भारत सरकार सैन्यदले आणि गुप्तहेर सूत्रे यांना धक्का देणारी बाब होती.

२) अनेक गुप्तहेर सूत्रानुसार पकिस्तानच्या हालचालींविषयी महिती उपलब्ध करण्यात आली असली तरी ती पुरेशी नव्हती.

३) उपलब्ध असलेल्या गुप्त माहितीचा उपयोग करुन कारगिल घुसखोरी टाळण्यासाठी आवश्यक असलेली कारवाई करण्यास संबंधित यंत्रणा पूर्णपणे अयशस्वी ठरली.

४) बिग्रेडिअर सुरिंदरसिंग यांनी काही उपकरणांची मागणी केली की जी उपकरणे भारतीय सेनेजवळ उपलब्ध नव्हती. या उपकरणांचा अभाव करुन काढण्यास कृती होणे आवश्यक होते.

५) कारगिल घुसखोरीसारख्या घटना भविष्यात टाळायच्य असतील तर भारतीय गुप्तहेर यंत्रणा अधिक प्रभावी करणे अत्यंत गरजेचे आहे.

६) कायमस्वरुपी राष्ट्रीय संरक्षण सल्लागाराची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

७) मनुष्यबळ व्यवस्थापन सीमा व्यवस्थापन आणि उच्च पातळीवरील सर्व्हिस हेडक्वार्टर्स आणि संरक्षण मंत्रालय यांच्यातील समन्वय यावर अधिक भर देण्यात यावा.

८) सशक्त अशा भारतीय लष्कराशी पाकिस्तानी सैनिक सामना करु शकले नाहीत. भारतीय संरक्षणाची मानसिक शक्ती, देशशक्ती आणि प्रगत अणू तंत्रज्ञान लक्षात घेऊनच पाकिस्तानने आपल्या हितचिंतकांच्या सल्ल्याने माघार घेतली.

आकृती क्रं. १ आकृती क्रं. २

परिणीती







**कारगील संघर्षात २६ जूलै १९९९ पर्यंत जबर मनुष्यहानी झाली.**

भारत - ४६१ - सैनिकांनी सर्वोच्च बलीदान केले, २५ - अधिकारी मूत झाले , ६८३ - सैनिक जखमी झाले. त्यापैकी ५४ अधिकारी होते.

पाकिस्तान - ७४५ - सैनिकांची प्राणहानी झाली. त्यापैकी ४५ अधिकारी दर्जाचे होते. भारतीय सैन्याला पाकिस्तानी सैनिकांची एकूण २४९ शवे मिळाली त्यापैकी २४४ युद्ध क्षेत्रात दफन केलीत.

- घुसखोरांनी ताब्यात घेतलेल्या प्रदेश भारताला मिळविण्यात यश.
- तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना कारगिल युद्धातील त्यांच्या नेतृत्वामूळे १९९९ च्या निवडणूकांमध्ये भाजपाला यश मिळाले.
- कारगीलच्या संघर्षामुळे भारताने अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त शस्त्रास्त्रांच्या निर्मितीस व आयातीस सुरुवात केली.
- कारगील प्रदेशात सीमेजवळ हिवाळ्यात सैनिक तैनात करण्यात आले.
- या प्रदेशात शत्रूची टेहळणी करण्यासाठी Sensors, रडार व उपग्रहाची मदत घेणे सुरु केले.

## निष्कर्ष : (Conclusion )

कारगील सारखे युध्द टाळायचे असल्यास आपल्या भारताची अंतर्गत व बाह्य गुप्तहेर संघटना अतिशय सतर्क व मजबुत करणे आवश्यक आहे. तसेच या प्रदेशाची माहिती माहिती मिळवायची असल्यास या उंच व बर्फाळ प्रदेशात Sensors, रडार यंत्रणा, उपग्रह प्रणाली , GIS व GPS या सारखी यंत्रणा बसविणे महत्त्वाची आहे. तरच पाकिस्तान व चीन सारख्या शत्रुंकडून होणाऱ्या छुप्या हल्ल्यांची माहिती गुप्तहेर संघटनेला त्वरीत मिळू शकेल व आपणास कारगील सारखे हल्ले टाळता येतील.

## संदर्भ (References):


१. पित्रे शशीकांत, "डोमेल ते कारगील", राजहंस प्रकाशन, पुणे- २०००.
२. जाधव व्ही.वाय."युध्द आणि भारताच्या संरक्षणाची रुपरेषा-भाग-२", प्रशांत पब्लिकेशन्स,जळगांव- २०१३.
३. खरे विजय, "जागतीक राजकारणात भारत", के सागर पब्लीकेशन, पुणे- २००८.
४. ढाके एस्.पी. व इतर , "संरक्षणशास्त्र", निराली प्रकाशन, पुणे- २००७.
५. चौरे महेश, "संरक्षणशास्त्र", विद्याभारती प्रकाशन, लातूर- २००७.
६. धर्माधिकारी अ.भ., "चाणाक्य मंडळ ", नोव्हेंबर -२००४.
७. दैनिक सकाळ, व्ही.के.मधोक, मेजर जनरल(निवृत्त), "भारतीय गुप्तचर यंत्रणेची फेररचना आवश्यक",२४ जानेवारी २००१.
८. दैनिक सकाळ, जे एन दिक्षित, निवृत्त परराष्ट्र सचिव,"राजनैतिक संघर्षातही यशस्वी झाले पाहिजे", २६ ऑक्टोबर २००१.
९. गोखले शरच्चंद्र, "झुंज दहशतवादाशी-काश्मीर एक अभ्यास", चीनार पब्लीकेशन्स, पुणे- २००५.
१०. https://mr.mwikipiedia.org>wiki.